# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 14 April 2025

## Time: 7.10 to 7.20 AM

## Language Marathi

## **आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

## **प्रादेशिक बातम्या**

## **दिनांक: १४ एप्रिल २०२५ सकाळी ७.१० मि.**

********

- भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची आज १३४ वी जयंती, राष्ट्रपतींकडून देशवासियांना शुभेच्छा
- छत्रपती संभाजीनगर शहरात डॉ आंबेडकर जयंतीनिमित्त मिरवणूका, अभिवादन, व्याख्यानं, रक्तदान शिबिरांचं आयोजन- मुख्य रस्ते राहणार दिवसभर बंद
- डिसेंबर २०२६ पर्यंत ८० टक्के शेतकऱ्यांना वर्षभर १२ तास मोफत वीज देणार, मुख्यमंत्र्यांची ग्वाही
- राज्यातल्या पहिल्या हरित ऊर्जा निर्मिती करणाऱ्या परभणी इथल्या महावितरण कार्यालयाचं उद्घाटन

आणि

- मराठवाड्यात तापमानात वाढ, पुढील तीन दिवस तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती आज साजरी होत आहे. यानिमित्त सर्वत्र विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशवासियांना आंबेडकर जयंतीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. सर्वांनी डॉ. आंबेडकरांचे आदर्श आपल्या जीवनात अंगीकारण्याचं आणि

सामाजिक सौहार्द आणि समानतेच्या भावनेने ओतप्रोत राष्ट्र निर्माण करण्यासाठी काम करण्याचं आवाहन राष्ट्रपतींनी केलं आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज डॉ आंबेडकर जयंतीनिमित्त हरियाणा दौऱ्यावर आहेत. पंतप्रधानांच्या हस्ते हिसार ते अयोध्या या नव्यानं सुरू होणाऱ्या विमान उड्डाण सेवेची सुरुवात, हिसार विमानतळाच्या नवीन टर्मिनल इमारतीची पायाभरणी, यमुनानगर इथं दीनबंधू छोटूराम औष्णिक वीज केंद्राच्या ८०० मेगावॅट आधुनिक औष्णिक वीज प्रकल्पाची पायाभरणी, भारतमाला परियोजनेअंतर्गत साडे चौदा किलोमीटर रेवाडी बाह्य वळणमार्गाचं उद्घाटन करण्यात येणार आहे. हिसार इथं जाहीर सभेला ते संबोधित करणार आहे.

****

छत्रपती संभाजीनगर शहरात विविध संस्था, संघटना, राजकीय पक्षांच्या वतीने डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात येणार आहे. विविध ठिकाणी मिरवणूका, अभिवादन, व्याख्यानं, रक्तदान शिबिर, भीम गीतांचे कार्यक्रम होणार आहेत. या पार्श्वभूमीवर शहरात मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. मिरवणुकीमुळे आज सकाळी दहा ते रात्री १० वाजेपर्यंत सहरातले मुख्य रस्ते वाहतूकीसाठी बंद राहणार असून, नागरिकांनी पर्यायी मागार्चा वापर करण्याचं आवाहन प्रशासनानं केलं आहे.

छत्रपती संभाजीनगर महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ ललित कला भवन उस्मानपुरा यांच्या वतीनं आज आंबेडकर जयंतीनिमित्त विजयकुमार पांचाळ यांचं व्याख्यान होणार आहे.

नांदेड जिल्हा परिषदेच्या वतीने देखील अभिवादन, पाणी वाटप, भीमगीत गायन आदी कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

****

डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त काल देशभरात विविध ठिकाणी पदयात्रा काढण्यात आली. केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांनी बिहारमध्ये पटना इथं गांधी मैदानापासून सुरु होणाऱ्या पदयात्रेला त्यांनी हिरवा

झेंडा दाखवला. तर राज्यमंत्री रक्षा खडसे मुंबईत भीम पदयात्रेत सहभागी झाल्या होत्या. हजारो संख्येनं तरुण यात सहभागी झाले होते. यावेळी रक्षा खडसे म्हणाल्या..

**बाईट – युवा व्यवहार आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे**

****

राज्यातही काल सकाळी जिल्हा प्रशासनाच्यावतीनं जय भीम पदयात्रा काढण्यात आली.

धाराशिव इथं पोलिस अधीक्षक संजय जाधव यांच्या हस्ते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पदयात्रेला सुरुवात झाली. या पदयात्रेत शालेय तसंच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसह कर्मचारी सहभागी झाले होते.

दरम्यान, तुळजापूर शहरातल्या भारतरत्न  डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचं आणि सुशोभीकरणाचं लोकार्पण काल आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते झालं. यावेळी या पुतळ्यावर हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी करण्यात आली.

परभणी इथं काढण्यात आलेल्या पदयात्रेत जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, परभणी महानगरपालिकेचे आयुक्त धैर्यशील जाधव उपस्थित होते. महात्मा फुले पुतळा ते बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापर्यंत काढण्यात आलेल्या या पदयात्रेत विद्यार्थी, खेळाडू आणि नागरिक मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते.

दरम्यान, परभणी शहरात जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी येणाऱ्या अनुयायांसाठी वाहतुकीत बदल करण्यात आले आहेत. नागरीकांनी त्याची नोंद घेण्याचं आवाहन प्रशासनाने केलं आहे.

जालना शहरात नूतन वसाहतीतून मस्तगडपर्यंत जय भीम पदयात्रा काढण्यात आली.

नांदेडमध्ये जिल्हा क्रीडा संकुल, क्रीडा वसतिगृह इथून आंतरराष्ट्रीय तीरंदाज सृष्टी जोगदंड यांच्या हस्ते या पदयात्रेला सुरुवात झाली.

छत्रपती संभाजीनगर इथं भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सवानिमित्त सुमारे अडीचशे विद्यार्थ्यांनी सलग अठरा तास वाचन करून बाबासाहेबांना आदरांजली वाहिली.

'गीत भीमायण'च्या बाविसाव्या गीताचं लोकार्पण काल डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांच्या हस्ते झालं. पोलीस अधीक्षक विनयकुमार राठोड आणि शाहीर नंदेश उमप यावेळी उपस्थित होते.

****

डिसेंबर २०२६ पर्यंत राज्यातल्या ८० टक्के शेतकऱ्यांना वर्षभर १२ तास मोफत वीज उपलब्ध करुन देण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. वर्धा जिल्ह्यात आर्वी इथं काल विविध विकासकामांचं लोकार्पण केल्यानंतर ते बोलत होते. राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या हिताचे विविध निर्णय घेऊन प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरु केल्याचं फडणवीस म्हणाले.

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

येत्या पाच वर्षात राज्यात सामान्य नागरिकांचं वीज बील दरवर्षी कमी होणार, तसंच ३०० युनीट पर्यंत वीज वापरणा-या मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबांना सौर ऊर्जेअंतर्गत आणून मोफत वीज देण्यात येईल, असंही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं. भूजल पातळी खोल जात असल्यामुळे शेतकऱ्यांना १० अश्वशक्तीचे कृषीपंप वापण्याची परवानगी देण्यात आल्याचं सांगून त्यांनी, प्रधानमंत्री सूर्यघर योजनेत सहभागी होण्याचं आवाहन राज्यातल्या नागरीकांना केलं.

****

विधान परिषदेच्या सभापती पदाच्या माध्यमातून सर्वसामान्य, वंचितांचे प्रश्न सोडवण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील राहू, अशी ग्वाही, सभापती प्राध्यापक राम शिंदे यांनी दिली. नांदेड इथं काल त्यांचा समाज बांधवांच्या वतीने गौरव करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. खासदार अशोक चव्हाण यावेळी

उपस्थित होते.  राम शिंदे यांनी नांदेड दौऱ्यात सचखंड गुरुद्वाराला देखील भेट दिली.

****

परभणी इथल्या महावितरण कार्यालयाने राज्यातलं पहिलं हरित ऊर्जा निर्मिती करणारं कार्यालय म्हणून मान मिळवला आहे. या कार्यालयात ३५ किलोवॅट सौरऊर्जा निर्मिती केली जाईल. ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते काल या कार्यालयाचं उद्घाटन झालं. पंतप्रधान सूर्यघर योजनेद्वारे नागरिकांना सौरऊर्जा मिळवण्याची संधी मिळणार असून, शेतकऱ्यांसाठी सौर कृषीपंप योजनेचा लाभ मिळवण्याचं आवाहन बोर्डीकर यांनी यावेळी केलं. त्या म्हणाल्या,

**बाईट –  ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर**

****

बीड जिल्ह्यातल्या परळी वैजनाथ रेल्वे स्थानकाच्या पुनर्विकासासाठी २५ कोटी सात लाख रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. राज्यातल्या एकूण १३२ रेल्वे स्थानकांच्या पुनर्विकास कार्यक्रम हाती घेण्यात आला असून, त्यात परळी रेल्वे स्थानकाचा समावेश आहे. याबद्दल आमदार धनंजय मुंडे यांनी रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव तसंच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले.

****

राज्य सरकारच्या मित्र या संस्थेच्या माध्यमातून राज्यात वेगवेगळे मोठे प्रकल्प सुरू करण्यात येणार असल्याची माहिती, या संस्थेचे उपाध्यक्ष तथा तुळजापूरचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली. ते काल धाराशिव इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. या माध्यमातून धाराशिव जिल्ह्यात शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढवण्यासाठी अणुऊर्जेवर आधारित अन्नप्रक्रिया प्रकल्प सुरू करण्यासंदर्भात प्रकल्प अहवाल तयार करण्यात येत आहे. यासाठी परदेशी गुंतवणूक आणण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचं आमदार पाटील यांनी सांगितलं.

****

धाराशिव जिल्ह्यातल्या येरमाळा इथं येडेश्वरी देवीच्या यात्रेदरम्यान काल चुनखडी वेचण्याचा सोहळा पार पडला. लाखो भाविक यावेळी उपस्थित होते.

****

लातूर शहरात रिंगरोड परिसरातल्या औरा थाई स्पा वर छापा मारत पोलिसांनी सेक्स रॅकेटचा पर्दाफाश केला. यावेळी दिल्ली, मुंबई, तेलंगणा राज्यातल्या पाच पीडित तरुणींची सुटका करण्यात आली. याप्रकरणी लातूर शहरातल्या एमआयडीसी पोलीस ठाण्यात अनैतिक व्यवसाय प्रतिबंध अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

****

अमेरिकेत सुरु असलेल्या तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेच्या पहिल्या टप्प्यात पुरुष रिकर्व सांघिक स्पर्धेत भारतीय संघानं रौप्य पदक जिंकलं. काल ऑबर्नडेल इथं झालेल्या अंतिम फेरीत, धीरज बोम्मादेवरा, तरुणदीप रॉय आणि अतनु दास यांच्या संघाला, चीन च्या संघाकडून पराभव पत्करावा लागला.

****

**हवामान**

राज्यात काल सर्वाधिक ४२ पूर्णांक सहा अंश सेल्सिअस तापमान चंद्रपूर इथं नोंदवलं गेलं. मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर इथं ४१ पूर्णांक चार, परभणी इथं ३९ पूर्णांक पाच अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. मराठवाड्यात पुढचे तीन दिवस तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

****